# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
## आरोग्य विभाग
### सर्क्युलर कोटेशन क्र. २/२०२०-२१

राज्यात सुरु असलेल्या करोना विषाणु (कोव्हिड-१९) च्या साथीच्या प्रादुर्भावाच्या अनुषंगाने महानगरपालिका कार्यक्षेत्रात होम क्वारंटाईन करण्यात आलेल्या नागरीकांच्या तपासणीसाठी थ्री लेयर मास्क व कॉटन मास्क खरेदी कामगिरीसाठी मक्तेदार यांचेकडून शर्ती अटीवर सर्क्युलर कोटेशन पद्धतीने मनपाच्या संकेतस्थळावर दर मागविण्यात येत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | दर प्रति नग सर्व करासहित |
|---|---|---|
| १ | थ्री लेयर मास्क | |
| २ | कॉटन मास्क | |

टिप :- १. कामाची मुदत वर्क ऑर्डर दिनांकापासून ७ दिवस राहील.
२. सुरक्षा अनामत अंदाजपत्रकीय रकमेच्या ५% भरावी लागेल.

**सुचना :-**

१. कोटेशन प्रक्रियेबाबत अधिक माहितीसाठी आरोग्य विभाग, सांगली येथे समक्षात संपर्क साधावा.
२. कोटेशन दर दि१७/६/२०२० पासून दि२३/६/२०२० रोजी दु.५.०० वा. पर्यंत दाखल करता येईल.
३. बंद लिफाफ्याद्वारे प्राप्त निविदा दि२३/६/२०२० रोजी दु.५.०० वा. आरोग्य विभाग, सांगली येथे उघडण्यात येईल.
४. कोटेशन दर कंपनी / फर्म लेटर पॅडवर देण्याचा आहे.
५. वर नमुद कामगिरीचे दर सर्व करासह बंद लिफाफ्यातून महापालिका आरोग्य विभाग, सांगली येथे समक्षात पोहोच करणेचे आहेत.
६. रितसर मंजुरीनंतर कमी दराच्या कोटेशनधारकास कामाचा पुरवठा आदेश देणेत येईल. त्यानुसार मुदतीत कामगिरी करणे बंधनकारक राहील.
७. कोणतेही कोटेशन स्विकारणे अथवा नाकारणेचा हक्क मनपाने राखून ठेवला आहे.

डॉ. सुनिल आंबोळे
वैद्यकिय आरोग्याधिकारी
सांगली मिरज कुपवाड शहर
महानगरपालिका

जाक्र.मनपा/आरोवि/सां/८४३/२०२०-२१
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दि.१७/६/२०२०

Recd
17/6

# सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
## आरोग्य विभाग
## सर्क्युलर कोटेशन क्र.२ /२०२०-२१

राज्यात सुरू असलेल्या करोना विषाणु (कोव्हिड-१९) च्या साथीच्या प्रादुर्भावाच्या अनुषंगाने महानगरपालिका कार्यक्षेत्रात होम क्वारंटाईन करण्यात आलेल्या नागरीकांच्या तपासणीसाठी थ्री लेयर मास्क व कॉटन मास्क खरेदी करणेकामी खाली नमुद केलेल्या शर्ती अटीवर महापालिकेच्या संकेतस्थळावर सर्क्युलर कोटेशन मागविण्यात येत आहे. त्याकामी सर्क्युलर शर्ती अटी खालीलप्रमाणे राहतील.

१. बंद लिफाफ्यामध्ये दरपत्रक देणेचे आहे.

२. कामाची मुदत मंजुरी नंतर वर्क ऑर्डर तारखेपासून ७ दिवस राहील.

३. कामगिरी वेळेत करणे बंधनकारक आहे.

४. a. निविदाधारकाचे EPF कायद्यानुसार नोंदणी प्रमाणपत्र व तद्नुषंगिक पुढील सर्व कार्यवाही करणेबाबतची कागदपत्रे निविदेसोबत जोडणेची आहेत. (लागू असेल तेथे) Employee Provident Fund and Miscellaneous provisions act १९५२ (Act no.१९ of १९५२) अन्वये ज्या मक्तेदाराकडे २० पेक्षा जास्त कर्मचारी वर्ग आहे, त्यांना EPF नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक आहे. २० पेक्षा कमी कर्मचारी वर्ग आलेल्या मक्तेदारांनी प्रति कर्मचारी त्यांच्या वेतनाच्या २५.३६% प्रमाणे EPF चलनाने मनपा निधीमध्ये जमा करणे आवश्यक आहे. त्याकरीता सोबत जोडलेल्या नमुन्यामध्ये प्रतिज्ञापत्र स्टॅम्पवर सादर करणे आवश्यक आहे.

b. महाराष्ट्र शासन परिपत्र क्र.GST/प्र.क्र.८१/कराधान-१ दि.१९ ऑगस्ट २०१७ यामधील नमुद मार्गदर्शक सुचनेनुसार GST ची अंमलबजावणी दि.०१ जुलै २०१७ पासुन सुरु केलेने GST अधिनियमानुसार कराची आकारणी होणार असल्याने त्याबाबत GST च्या करासहीत करून निविदा दर भरणेचा आहे. तसेच GST बाबत शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या निर्देशानुसार व GST नोंदणी प्रमाणपत्र दि.१९ ऑगस्ट २०१७ चे व त्यापुढे वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या निर्देशानुसार आवश्यक कार्यवाही मक्तेदारवर बंधनकारक राहील. ज्या मक्तेदाराकडे कोणत्याही कारणांमुळे GST प्रमाणपत्र नाही त्यांना देय होणाऱ्या GST कराची रक्कम त्यांच्या देयकातून नियमानुसार अनुज्ञेय दंडात्मक दरानुसार कपात केला जाईल. तसेच मक्तेदाराकडे EPF / GST नोंदणी प्रमाणपत्र उपलब्ध नाही ते मक्तेदार कोटेशनप्रक्रियेत सहभागी होऊ शकतात.

५. सर्क्युलर दर हा सर्व कर व वाहतुकीसह देणेचा आहे. सर्क्युलर दर मंजुरी नंतर साहित्य पुरवठा करणेची लेखी ऑर्डर ठेकेदारास देण्यात येईल.

६. ज्याचे नावे कामगिरी मंजुर होईल त्यांनी एकूण रकमेच्या ५% सुरक्षा अनामत रोखीने भरुन स्वखर्चाने इकडील नमुन्यात लेखी करारपत्र करून देणेचे आहे.

७. ज्याचे नांवे कामगिरी मंजुर होईल त्यास कोणत्याही कारणास्तव कामगिरी न करता माघार घेता येणार नाही. अथवा परस्पर इतर व्यक्ती, संस्था, भागीदार यांना हस्तांतरीत करता येणार नाही.

८. कोणतेही एक अथवा सर्व कोटेशन मंजुर अथवा नामंजुर करण्याचा अधिकार महापालिकेने राखून ठेवला आहे.

९. तसेच शर्ती व अटीमध्ये बदल करण्याचा व वाढ करण्याचा व तसेच सर्क्युलर दर दाखल करणेस मुदतवाढ देणेचा अधिकार महापालिकेने राखून ठेवला आहे. सर्क्युलर शर्ती अटीमधील सर्व बाबींची पुर्तता करु शकणाऱ्या आणि नमुद कामगिरी करु शकणाऱ्या कोटेशन धारकांनीच सर्क्युलर प्रक्रियेत सहभागी होणेचे आहे.

१०. मागणीप्रमाणे वेळेवर कामगिरी न केल्यास प्रतिदिन र.रु.२००/- मात्र इतका दंड आकारण्यात येईल. तसेच मंजुर मक्तेदाराने मुदतीत कामगिरी न केलेस २ नंबरच्या कोटेशन धारकास कामाचा आदेश देण्यात येईल आणि त्यामध्ये जो जादाचा खर्च येणार आहे. तो मंजुर निविदाधारकाकडून वसुल करण्यात येईल.

वरील शर्ती / अटी आम्हांस मान्य आहेत.

निविदा धारकाची सही / शिक्का